# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र.121 /२०२५**

सर्व शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/सेवकांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, विद्यापीठ परिपत्रक क्र.२७/२०२५, जा.क्र.एएन/५६६, दिनांक ०८ फेब्रुवारी, २०२५ अन्वये विद्यापीठाचा ७६ वा वर्धापनदिन सोमवार, दिनांक १० फेब्रुवारी, २०२५ रोजी साजरा करण्यात येत असल्याने सदर समारंभाच्या पूर्वतयारीविषयक कामकाजाकरिता रविवार, दिनांक ०९ फेब्रुवारी, २०२५ या सुट्टीच्या दिवशी विद्यापीठ कार्यालय (अहिल्यानगर उपकेंद्र व नाशिक उपकेंद्र येथील कार्यालय वगळून) नेहमीप्रमाणे सुरू ठेवण्यात आलेले होते. या सुट्टीच्या दिवशी विद्यापीठ कार्यालयात नियमित कार्यालयीन/कार्यक्रमांबाबतचे कामकाज पार पाडण्यात आलेले असून सदर दिवसाची पर्यायी सुट्टी **बुधवार, दिनांक ३० एप्रिल, २०२५ रोजी ''अक्षय तृतीया''** या सणाकरिता जाहीर करण्यात येत आहे. (परीक्षा विभागातील कामकाजाची निकड लक्षात घेता, बुधवार, दिनांक ३० एप्रिल, २०२५ रोजी परीक्षा व परीक्षा संबंधी इतर कामकाज हे अत्यावश्यक स्वरूपाचे असल्याने संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीबाबत आवश्यकतेनुसार आदेश निर्गमित करण्याचे अधिकार मा.प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांना राहतील.)

सबब, बुधवार, दिनांक ३० एप्रिल, २०२५ रोजी विद्यापीठ कार्यालय बंद राहील, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**टिप :- अहिल्यानगर उपकेंद्र व नाशिक उपकेंद्र येथील कार्यालयांना सदर दिवसाची (दि.३०/०४/२०२५) स्थानिक सुट्टी विद्यापीठ परिपत्रक क्र.२१०/२०२५, जा.क्र.एएन/१४२४, दि.२८/०४/२०२५ अन्वये जाहीर करण्यात आलेली आहे.**

**(प्रा.(डॉ.) ज्योती भाकरे)**
**प्रभारी कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
जा.क्र. : एएन/ 1435
दिनांक : 29 APR 2025

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. मा.संचालक, सर्व प्रशाला
३. मा.शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग
४. मा.प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालये
५. मा.संचालक, विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त सर्व संस्था
६. मा.कुलसचिव, महाराष्ट्रातील सर्व अकृषी विद्यापीठे

} सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील सर्व संबंधित शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/ सेवकांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.